दै. सत्यप्रभा दि. 04/01/2025

दैनिक सत्यप्रभा
शेवटचे पान

# पोलिसांच्या मोहिमेत सहा गुन्हेगार गजाआड

## दोन लोखंडी खंजर जप्त



**नांदेड,दि.३ – ग्रामीण पोलिसांकडून शुक्रवारी पहाटे चार ते सकाळी ७ वाजताच्या दरम्यान राबविण्यात आलेल्या मोहिमेत रेकॉर्डवरील सहा गुन्हेगारांना गजाआड करून त्यांच्याकडून दोन लोखंडी खंजर जप्त करण्यात आले आहेत.**

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत रेकॉर्ड वरील व हिस्ट्रीशीट आरोपी चेक करून त्यांच्याविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार इतवाराचे उपविभागीय अधिकारी सुशीलकुमार नायक आणि ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक महेश कोरे, विश्वदिप रोडे पोहेकॉ जाधव, पोहेकॉ वाकडे, पोहेकॉ सत्तार, पोकॉ माने, पोकॉ पचलिंग, पोकॉ कलंदर, पोकॉ. कल्याणकर,पोकॉ सिरमलवार यांनी शुक्रवार दि.३ जानेवारी रोजी पहाटे चार ते सकाळी ७ वाजताचे दरम्यान रेकॉर्डवरील व हिस्ट्रिशीट आरोपी चेक करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली.

या मोहिमे दरम्यान दोन आरोपीकडे आढळून आलेले दोन लोखंडी खंजर जप्त करुन तयांच्यावर कलम ४/२५ शस्त्र अधिनियम प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आला आहे. तसेच तीन आरोपी हे वेगवेगळ्या भागात संशयास्पदरित्या चोरी करण्याच्या उद्देशाने दबा धरुन बसलेले मिळुन आल्याने त्यांच्यावर कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे वेगवेगळी तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून कलम ६८,६९ म.पो. का. प्रमाणे संतोष किशन कंधारे (वय २१), व्यवसाय बेकार रा.नवी आबादी विष्णुपुरी, संघर्ष सुनील पवळे (वय २५) व्यवसाय बेकार रा. बळीरामपुर, सतीष बालाजी चव्हाण (वय २०) व्यवसाय बेकार रा.बळीरामपुर, ओमनाथ बालाजी चव्हाण (वय २५ ) व्यवसाय बेकार रा.बळीरामपुर, संघरत्न माधव बाघमारे (वय १८ )व्यवसाय बेकार रा. शाहुनगर या सहा आरोपी ताब्यात घेतले आहेत.